# दि आष्टा पीपल्स को-ऑप. बँक लि;आष्टा.

मुख्य कार्यालय आष्टा, ता.वाळवा,जि.सांगली.

## लॉकरभाडे करारनामा

खाते नं.

दि आष्टा पीपल्स को-ऑप. बँक लि;आष्टा. यांसी

नांव ____________________ )

पत्ता ____________________ ) भाडे करार लिहून देणार

वय __________ धंदा __________ )

आपल्या बँकेच्या सुरक्षा गृहामध्ये लॉकर भाड्याने देणेबाबत केलेला अर्ज आपण मान्य करून आम्हांस ______ वर्गा चा लॉकर क्रमांक ________ वापरण्यास देणेचे कबूल केल्यावरून आम्ही भाडे करारनामा लिहून देत आहोत तो असा की,

१) सुरक्षागृहामधील लॉकर भाड्याने देण्याबद्दलचे आपले बँकेचे सर्व नियम व अटी वाचल्या असून त्या आम्हांस सर्वस्वी मान्य आहेत. यापुढे सदर नियमांत बँक वेळोवेळी जे बदल करील ते सर्व आमच्यावर बंधनकारक राहतील.

२) सदर करारनाम्याच्या पोटी आजरोजी तिमाही / वार्षिक भाडे रू. ______________ आगाऊ द्यावयाचे ते दिले आहे. करारनाम्याची मुदत आजपासून दि. ______________ पर्यंत आहे. या मुदतीत बँकेचे लॉकर मोकळा करून देवू. मुदतीनंतर लॉकर वापरण्याचा असल्यास पुढील मुदतीसाठी बँकेने ठरविलेले दराने मी/आम्ही आगाऊ भाडे भरेन भाडे अथवा माझे / आमचे सेव्हिंग्ज खातेवरून घेणेत यावे व भरलेल्या मुदतीसाठी ते करारपत्र पुढे चालु राहील. तसे न झाल्यास आमच्यावर पडणाऱ्या जबाबदारीस आम्ही पात्र राहू.

३) भाडे कराराची मुदत संपण्यापुर्वी आम्ही मयत झाल्यास आमच्या पश्चात लॉकर उघडण्याचे जरूर ते अधिकार आपणाकडे देवून ठेवले आहे. आम्ही ठरविलेल्या सांकेतिक शब्द आमचे गोप्य म्हणून पाळू याबाबत काही चूक झाल्यास त्याची जबाबदारी आमच्यावर राहील.

४) लॉकरची किल्ली मला मिळाली असून ती काळजीपुर्वक जतन करू व हरविल्यास आपणांस ताबडतोब कळवू. किल्ली हरविल्याने अगर दुसऱ्या कोणत्याही कृत्याने बँकेचे लॉकर-व्यवहाराबद्दल नुकसान झाले तर ते विनातक्रार भरून देवू.

५) लॉकर उघडण्याचा अधिकार आमच्यातर्फे ज्या कोणास दिला असेल त्यांचे नांव पत्ता व सहिचा नमुना आपणांस देवू. नेमलेल्या मुखत्यारांत बदल करावयाचा असल्यास तसे बँकेस लेखी कळवू. तत्पुर्वी बँकेच्या दप्तरी नोंद असल्यास मुखत्याराच्या सर्व व्यवहारास जबाबदार राहू. त्याची जबाबदारी कोणत्याही कोठल्याही प्रकारे बँकेवर नाही. मुखत्यार बदलतेवेळी जरूर वाटल्यास आम्ही सांकेतिक शब्द बदलू व तसे लेखी कळवू.

६) आजरोजी आपल्या सुरक्षागृहामधील ______ वर्गाचा लॉकर क्रमांक ________ हा वापरण्याकरता बँकेचे नियम व या करारानुसार आम्हास दिला असून तो आम्ही घेत आहोत. हा लॉकर मुदतीत मोकळा करून न दिल्यास बँकेच्या नियमान्वये तजविज करून तो आमचे जबाबदारी व खर्चाने मोकळा करून घ्यावा.

७) भाडे अगर इतर ज्या रक्कमा आम्ही बँकेस देणे असेल त्याची भरपाई करण्यासाठी लॉकरमधील सर्व जिन्नसावर बँकेचा तारण हक्क राहील. आम्ही अगर आमचा मुखत्यार, अधिकृत इसम अगर वारस याने आपल्या बँकेचे जे देणे होईल ते न दिले तर लॉकरमधील जिन्नस बँकेने विकून वसूल करून घ्यावे. ती रक्कम कमी असल्यास त्याची भरपाई करण्यास आम्ही अगर आमचे वारस जबाबदार आहोत.

८) मी/ आम्ही लॉकर सलग एक वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीत ऑपरेट न केलेस आमचेकडून लॉकर का ऑपरेट केले नाही, याबद्दल लेखी खुलासा घेवून, यासाठी लॉकर ऑपरेट करणेबाबत अथवा लॉकरची आवश्यकता नसल्यास संबंधीत लॉकर बँकेच्या ताब्यात परत देणेबाबत ठराविक मुदत नमूद करून मला/आम्हास सुचना पत्र देवून व सुचना पत्र देवूनही मी/आम्ही लॉकर ऑपरेट न केलेस जरी लॉकरभाडे वेळेत भरले असले तरी माझे/आमचे लॉकर रद्द करून पंचासमक्ष लॉकर उघडणेचा अधिकार बँकेस राहील. सदर लॉकर उघडणेसाठी होणारा खर्च मी स्वत: भरेन अगर माझे बँकेकडील वैयक्तीक खातेवरून घेणेस बँकेस अधिकार राहतील.

९) हा करारनामा व सुरक्षागृहातील लॉकर भाड्याने देण्याबद्दलचे सर्व नियम व या दोहोमुळे उत्पन्न होणारे उभयतांचे संबंध व आमच्यावर येत असलेल्या जबाबदाऱ्या आम्ही व आमच्या वारसांवर बंधनकारक आहेत. तसेच आमच्या पश्चात नेमून दिलेले अधिकृत इसम,एक्सिक्युटर्स,ॲडमिनीस्ट्रेटर्स व्यवस्थापक वगैरे याजवर बंधनकारक आहेत.

१०) हा करारनामा आम्ही राजीखुशीने व अक्कलहुशारीने लिहून दिला आहे.

आष्टा ____________________

दिनांक : / /

साक्षीदार - करारनामा लिहून देणाऱ्याची सही

नांव : ____________________